निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शुक्रवार
२३ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३२९ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## संक्षिप्त

### गडचिरोली जिल्ह्यात टसर रेशीम कोष बाजारपेठ उभारणीस मान्यता

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील टसर रेशीम उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनास योग्य व हमखास दर मिळावा, तसेच पूर्व विदर्भातील टसर रेशीम मूल्यसाखळी अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे शासकीय टसर रेशीम कोष बाजारपेठ उभारण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ अंतर्गत हा निर्णय घेण्यात आला असून, या प्रकल्पासाठी ३.८८ कोटी इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. या आधुनिक टसर रेशीम कोष बाजारपेठेमुळे रेशीम शेतकऱ्यांना खुल्या व पारदर्शक बाजारात विक्रीची सुविधा उपलब्ध होणार असून, कोषांना योग्य व स्पर्धात्मक दर मिळणार आहे.

या माध्यमातून टसर रेशीम उत्पादन, साठवण, लिलाव व विपणनासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण होणार आहेत. तसेच स्थानिक स्तरावर रोजगारनिर्मिती होऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. या बाजारपेठेसाठी प्रशासकीय इमारत, पाणीपुरवठा, स्वच्छता व्यवस्था, विद्युतीकरण, दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा, अंतर्गत रस्ते व निचरा व्यवस्था आदी सर्व आवश्यक घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी रेशीम संचालनालयामार्फत करण्यात येणार असून, केंद्र सरकारच्या केंद्रीय रेशीम मंडळ यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही केली जाणार आहे. हा उपक्रम टसर रेशीम शेतकऱ्यांसाठी आर्थिक स्थैर्य, बाजारातील विश्वास व शाश्वत उत्पन्नाचा मजबूत आधार ठरणार आहे. याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

### माजी सैनिक, सैनिक पत्नी व पाल्यांसाठी मेस्को सिक्युरिटीमध्ये भरती

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** माजी सैनिक, वीर नारी तसेच सेवानिवृत्त व सेवेतील जवानांच्या पत्नी आणि अवलंबित पाल्यांसाठी मेस्को सिक्युरिटीकडून सुरक्षा रक्षक पदासाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही भरती कंत्राटी सेवा पद्धतीवर असून, उमेदवारांना त्यांच्या राहत्या घरापासून १० ते १५ किलोमीटर अंतरावर कामाचे ठिकाण देण्यात येणार आहे अशी माहिती मुंबई शहरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

कंत्राटी सेवा पद्धतीवर सुरक्षा रक्षक भरण्यात येणार आहे. या पदासाठी दररोज ८ तास काम, आठवड्यातून १ साप्ताहिक सुट्टी, पीएफ ईएसआय अंतर्गत जीवन विमा सुविधा, बोनस व ग्रॅच्युइटी या सुविधा आहेत. या पदासाठी एक्स सर्व्हिसमन, आर्मी, नेव्ही व एअर फोर्स साठी ३५ ते ५८ वर्षे, सीआरपीएफ, एसआरपीएफ, बीएसएफ, सीआयएसएफ, आयटीबीपी, होमगार्ड यासाठी ३५ ते ५५ वर्षे वयोमर्यादा, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर नारी : १८ ते ४५ वर्षे, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर पत्नी १८ ते ४५ वर्षे, माजी सैनिकांच्या (ईएसएम) वीर पाल्य ईएसएम पाल्य : २१ ते ३५ वर्षे ही वयोमर्यादा आहे.

या पदासाठी आवश्यक कागदपत्रे आधार कार्ड,पॅन कार्ड, बँक पासबुक (स्वतःचे व वारसाचे), डिस्चार्ज बुक, पीपीओ, एक्स सर्व्हिसमन आयडी (सेवानिवृत्त जवानांसाठी), मेस्को कोर्स सर्टिफिकेट (वीर नारी, सेवानिवृत्त व सेवेतील जवानांच्या पत्नी व पाल्यांसाठी) मेस्को सिक्युरिटीद्वारे राबविण्यात येणारी ही भरती प्रक्रिया माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांसाठी आर्थिक स्थैर्य आणि सुरक्षित भविष्याची दिशा देणारी ठरणार आहे. इच्छुक व पात्र उमेदवारांनी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन मुंबई शहर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

संपर्कासाठी क्रमांक:- क्षेत्रीय व्यवस्थापक (९९९०३१२३१२), सुरक्षा अधिकारी (७४२०००२८३१) कार्यालयीन दूरध्वनी (९४६६८१९८८७)




# १५ महापालिकांत 'महिला राज'; मुंबई-पुण्यात पुन्हा चुरस!

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल लागल्यानंतर सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत आज जाहीर झाली. २९ पैकी तब्बल १५ महापालिकांचे नेतृत्व महिलांकडे सोपवण्यात आले आहे. यामध्ये मुंबई, पुणे, नागपूर यांसारख्या 'ए-ग्रेड' शहरांचा समावेश असल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

मुंबई आणि पुणे: दोन्ही महत्त्वाच्या शहरांचे महापौरपद 'सर्वसाधारण महिला' प्रवर्गासाठी आरक्षित.

एकूण चित्र: २९ पैकी १७ पदे खुली, ८ ओबीसी, ३ अनुसूचित जाती आणि १ अनुसूचित जमाती साठी आरक्षित.

राजकीय गोंधळ: मुंबईतील सोडतीवेळी शिवसेना (ठाकरे गट) ने अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळल्याचा आणि चक्राकार पद्धत न पाळल्याचा आरोप करत जोरदार घोषणाबाजी केली.

मुंबई महापौर आरक्षणावेळी शिवसेना नेत्या किशोरी पेडणेकर आणि इतर कार्यकर्त्यांनी आक्रमक पवित्रा घेतला. त्यांच्या मते, मुंबईत आरक्षण देताना ठराविक प्रवर्गांना डावलले गेले असून ही प्रक्रिया सत्ताधाऱ्यांच्या फायद्यासाठी 'मॅनिपुलेट' केली असल्याचा त्यांचा आरोप आहे. विशेषतः ओबीसी आणि अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या बाबतीत फिरत्या आरक्षणाचा नियम पाळला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**तुमच्या शहराचा महापौर कोणत्या प्रवर्गाचा? (संपूर्ण यादी)**

| अ.क्र. | महानगरपालिका महापौर | आरक्षण प्रवर्ग | अ.क्र. | महानगरपालिका महापौर | आरक्षण प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई | सर्वसाधारण महिला | १६ | अमरावती | सर्वसाधारण खुला |
| २ | पुणे | सर्वसाधारण महिला | १७ | चंद्रपूर | ओबीसी (महिला) |
| ३ | नागपूर | सर्वसाधारण महिला | १८ | सांगली-मिरज-कुपवाड | सर्वसाधारण खुला |
| ४ | ठाणे | अनुसूचित जाती (खुला) | १९ | वसई-विरार | सर्वसाधारण खुला |
| ५ | कल्याण-डोंबिवली | अनुसूचित जमाती (खुला) | २० | मिरा-भाईंदर | सर्वसाधारण महिला |
| ६ | नवी मुंबई | सर्वसाधारण महिला | २१ | उल्हासनगर | ओबीसी (खुला) |
| ७ | छत्रपती संभाजीनगर | सर्वसाधारण खुला | २२ | भिवंडी-निजामपूर | सर्वसाधारण खुला |
| ८ | नाशिक | सर्वसाधारण महिला | २३ | पनवेल | ओबीसी (खुला) |
| ९ | पिंपरी-चिंचवड | सर्वसाधारण खुला | २४ | मालेगाव | सर्वसाधारण महिला |
| १० | कोल्हापूर | ओबीसी (खुला) | २५ | धुळे | सर्वसाधारण महिला |
| ११ | सोलापूर | सर्वसाधारण महिला | २६ | नांदेड-वाघाळा | सर्वसाधारण महिला |
| १२ | लातूर | अनुसूचित जाती (महिला) | २७ | परभणी | सर्वसाधारण खुला |
| १३ | जळगाव | ओबीसी (महिला) | २८ | इचलकरंजी | ओबीसी (खुला) |
| १४ | अहिल्यानगर | ओबीसी (महिला) | २९ | जालना | अनुसूचित जाती (महिला) |
| १५ | अकोला ओबीसी | (महिला) | | | |

## मुंबई व पुणे विद्यापीठांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उभारण्याबाबत बैठक

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** राज्यातील अनेक आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी दुर्गम भागातून मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये येतात. या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक परिसरात राहण्याची सोय व्हावी यासाठी मुंबई व पुणे विद्यापीठाच्या परिसरात वसतिगृह उभारण्यासंदर्भात आढावा बैठक आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

बैठकीस मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, ठाणे अप्पर आयुक्त गोपीचंद कदम, सहसचिव मच्छिंद्र शेळके, मुख्य अभियंता उज्वल डाबे उपस्थित होते. आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके म्हणाले, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी लागणाऱ्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभाग नेहमीच प्रयत्नशील असतो. अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी आपला जिल्हा सोडून इतर जिल्ह्यात जात असतात. या वसतीगृहांचा लाभ केवळ विद्यापीठातीलच नव्हे तर विद्यापीठाशी संलग्न विविध महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनाही मिळणार आहे. त्यामुळे एकाच ठिकाणी अनेक विद्यार्थ्यांना सुरक्षित व परवडणाऱ्या निवासाची सोय उपलब्ध होणार आहे. आगामी काळात राज्यातील इतर प्रमुख विद्यापीठांच्या परिसरातही अशाच प्रकारच्या वसतीगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आदिवासी समाजाचा इतिहास आणि संस्कृती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रमुख विद्यापीठामध्ये आदिवासी अध्ययन व संशोधन केंद्र सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## शेअर बाजारात 'ट्रम्प कार्ड'ची जादू!



### सेन्सेक्स ७५० अंकांनी उसळला; गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये परतले

**आत्ताच एक्सप्रेस**
**मुंबई/ प्रतिनिधी/** गेल्या काही दिवसांपासून सातत्याने घसरणाऱ्या भारतीय शेअर बाजाराला आज अखेर उभारी मिळाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या एका सकारात्मक विधानाने जागतिक बाजारात नवचैतन्य आले असून, त्याचे पडसाद दलाल स्ट्रीटवरही उमटले. आज बाजार उघडताच सेन्सेक्समध्ये तब्बल ७५० हून अधिक अंकांची तेजी पाहायला मिळाली, तर निफ्टीने २५,४०० चा टप्पा यशस्वीपणे ओलांडला.

> अमेरिकेने युरोपवरील टॅरिफचा निर्णय पुढे ढकलणे ही जागतिक अर्थव्यवस्थेसाठी मोठी दिलासादायक बातमी आहे. यामुळे भारतासारख्या विकसनशील बाजारपेठांमधील जोखीम कमी झाली असून, येणाऱ्या काळात बाजार अधिक स्थिर होऊ शकतो.
> **- व्ही. के. विजयकुमार,**
> मुख्य गुंतवणूक रणनीतीकार, जिओजित इन्व्हेस्टमेंट.

**बाजार वधारण्यामागील ३ मुख्य कारणे:**

**१. ट्रम्प यांची 'नरमाई' आणि ग्रीनलँडचा मुद्दा:**
डोनाल्ड ट्रम्प यांनी ग्रीनलँडवर ताबा मिळवण्यासाठी सैन्याचा वापर करणार नाही, असे स्पष्ट केल्याने जागतिक युद्धाची भीती कमी झाली आहे. तसेच, युरोपियन देशांवर लादले जाणारे 'टॅरिफ' (व्यापार शुल्क) सध्या लांबणीवर टाकल्यामुळे अमेरिका-युरोपमधील 'ट्रेड वॉर'चा धोका टळला आहे.

**२. भारत-अमेरिका व्यापार कराराचे संकेत:**
दावोसमध्ये बोलताना ट्रम्प यांनी भारतासोबत लवकरच एक मोठा आणि सकारात्मक व्यापार करार करण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे भारतीय उद्योगांमध्ये उत्साहाचे वातावरण असून गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला आहे.

**३. मिडकॅप आणि स्मॉलकॅपमध्ये 'दिवाळी':** गेल्या अनेक दिवसांपासून विक्रीचा दबाव झेलणाऱ्या मिडकॅप आणि स्मॉलकॅप शेअर्समध्ये आज पुन्हा एकदा जोरदार खरेदी दिसून आली. जागतिक स्तरावरील अनिश्चितता कमी झाल्याने गुंतवणूकदारांनी पुन्हा एकदा इक्विटीमध्ये पैसा गुंतवण्यास सुरुवात केली आहे.

**आजची स्थिती एका नजरेत:**
सेन्सेक्स: ७७३ अंकांची उसळी घेत उच्चांकी पातळीवर.
निफ्टी: २४५.३५ अंकांच्या वाढीसह २५,४०० च्या पार.
गुंतवणूकदार: गेल्या तीन दिवसांच्या घसरणीनंतर आज गुंतवणूकदारांच्या संपत्तीत मोठी भर.

# आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून महाराष्ट्राने रचली यशोगाथा

### सौर ऊर्जेच्या माध्यमातून वर्षअखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज निर्मिती - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**
**दावोस / प्रतिनिधी/** महाराष्ट्राने आशियातील सर्वात मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवून यशोगाथा रचली आहे, असे नमूद करून या वर्षाच्या अखेरपर्यंत १६ गिगावॅट वीज सौर ऊर्जे च्या माध्यमातून उपलब्ध होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वर्ल्ड ईकॉनॉमिक फोरमच्या वार्षिक बैठकीच्या निमित्ताने इंडिया पॅव्हेलियनमध्ये इंटरनॅशनल सोलर अलायन्सच्या वतीने आयोजित 'स्केलिंग सोलर एनर्जी व्हेअर इट मॅटर' या विषयावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी मांडणी केली. यावेळी केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी रूफटॉप सोलर, सौर पंप, अब्जावधींची वीजखर्च बचत, कार्बन उत्सर्जनात मोठी घट, तसेच सौरऊर्जा, बॅटरी स्टोरेज आणि पंप स्टोरेजद्वारे भविष्यात राज्य व राष्ट्रीय वीज ग्रीड स्थिर करण्याच्या योजनांची माहिती दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्राने दशकापेक्षा कमी काळात संपूर्ण ऊर्जा क्षेत्राचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांमध्ये १० टक्के हे कृषि पंपधारक आहेत, जे एकूण विजेच्या ३०% वीज वापरत होते. त्यांना वीज पुरवठा करण्याचा खर्च प्रति युनिट ८ रुपये होता, तर त्यांच्याकडून फक्त १ रुपया आकारला जात असे. उर्वरित ७ रुपये राज्याकडून किंवा 'क्रॉस सबसिडी'च्या स्वरूपात दिले जात होते, ज्यामुळे औद्योगिक आणि इतर ग्राहकांसाठीच्या विजेच्या दराचा भार वाढत होता. हे एक दुष्टचक्र होते. मात्र, प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजींच्या दूरदृष्टीने आम्ही शेतीचा संपूर्ण वीज भार सौर ऊर्जेवर हलवण्याचा निर्णय घेतला. आशियातील सर्वात मोठी 'विकेंद्रित सौर ऊर्जा योजना' सुरू केली. याद्वारे प्रत्येक कृषी फिडर स्वतंत्रपणे सौरऊर्जेवर आणला गेला. शेतकऱ्यांना वीज पुरवण्यासाठी आम्ही स्वतंत्र कंपनी स्थापन केली. आता या वितरण प्रणालीद्वारे सुमारे १६ गिगावॅट वीज निर्माण केली जाईल आणि या वर्षाच्या अखेरीस आम्ही हा प्रकल्प पूर्ण करू. हे काम प्रगतीपथावर आहे. आम्ही दरमहा सुमारे ५०० मेगावॅट समर्पित करत आहोत आणि लवकरच १ गिगावॅट वीज निर्मिती पर्यंत पोहोचू. या दरम्यान, शेतकऱ्यांना वीज पुरवठ्याचा जो खर्च ८ रुपये होता, तो आता ३ रुपयांपेक्षा कमी झाला आहे. यामुळे उद्योग आणि घरगुती ग्राहकांवरील खर्चाचा बोजा कमी झाला असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. महाराष्ट्रात 'पीएम सूर्य घर योजना' उत्तमरित्या राबविली जात आहे. यातून सुमारे ४ गिगावॅट क्षमतेचे रूफटॉप सोलर संयत्र कार्यान्वित होणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यातून आता केवळ घरा-घरासाठी वीज मिळते आहे, असे नाही, तर ती प्रकाशाने उजळून निघताहेत. शिवाय यातून शिल्लक वीज ग्रीडलाही पुरवली जात आहे. यामुळे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी होऊ लागले आहे. आम्ही आता केंद्र कृषि पंपाच्या नवीन जोडण्यांसाठी केंद्र सरकारच्या योजनेच्या धर्तीवर ' मागेल त्याला सौर पंप' योजना सुरू केली. यात संपूर्ण भारतात जेवढे सौर पंप बसवले आहेत, त्यापैकी ६०% महाराष्ट्रात आहेत. लवकरच ही संख्या १० लाखांच्या पार जाईल. याचा परिणाम असा झाला आहे की, पुढील ५ वर्षांसाठी आमचा 'मल्टी-इयर टॅरिफ' (विजेचे दर), जो दरवर्षी ९% ने वाढत होता, तो आता कमी होत आहे. पुढील ५ वर्षांत आम्ही वीज खरेदीच्या खर्चात १० अब्ज डॉलर्सची बचत करू, असेही त्यांनी सांगितले. सौरऊर्जा कार्यक्रमामुळे होणारी कार्बन उत्सर्जन कपात ही ३०० कोटी झाडे लावण्याइतकी असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, २०३२ पर्यंत आम्ही आणखी ४५ गिगावॅट वीज निर्माण करू, ज्यापैकी ७०% सौर ऊर्जा असेल. ३-४ वर्षांपूर्वी आमचे नूतनीकरणक्षम ऊर्जेचे प्रमाण १३% होते, जे २०३० पर्यंत ५२% होईल. ग्रीड स्थिर करण्यासाठी आम्ही बॅटरी स्टोरेज आणि पश्चिम घाटातील भौगोलिक परिस्थितीचा फायदा घेत 'पंप स्टोरेज' प्रकल्पांवर भर देत आहोत. आम्ही ८०,००० मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज प्रकल्प सुरू केले आहेत, जे लवकरच एक लाख मेगावॅटपर्यंत पोहोचतील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# नेताजी सुभाषचंद्र बोस : समताधिष्ठित राष्ट्रनिर्मितीचा तेजस्वी मार्ग

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास हा केवळ राजकीय सत्तांतराचा दस्तऐवज नसून तो भारतीय समाजाच्या आत्मसन्मानाचा, सामाजिक परिवर्तनाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रदीर्घ संघर्ष आहे. या संघर्षात अनेक थोर नेत्यांनी आपले विचार, कृती आणि बलिदान यांच्या माध्यमातून राष्ट्राला नवी दिशा दिली. मात्र या सर्वांमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण तेजस्वी, धैर्यशील आणि दूरदृष्टीपूर्ण होते. नेताजी हे केवळ सशस्त्र क्रांतीचे नेतृत्व करणारे योद्धा नव्हते, तर ते भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि नैतिक पुनर्रचनेचे स्वप्न पाहणारे महान समाजचिंतक होते. २३ जानेवारी १८९७ रोजी ओडिशातील कटक येथे जन्मलेले नेताजी संपूर्ण आयुष्य देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटले.

नेताजींच्या जीवनकार्याचा विचार करताना हे स्पष्टपणे जाणवते की, त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्याचा अर्थ अत्यंत व्यापक होता. परकीय सत्तेपासून मुक्त होणे हे स्वातंत्र्याचे केवळ पहिले पाऊल आहे, असे ते मानत. त्यांच्या मते, खरे स्वातंत्र्य तेव्हाच प्राप्त होईल, जेव्हा भारतीय समाजातील प्रत्येक व्यक्तीला सामाजिक न्याय, आर्थिक संधी, मानवी सन्मान आणि सुरक्षित जीवनाचा अधिकार मिळेल. जात, धर्म, वर्ग, लिंग किंवा भाषेच्या आधारे होणारा भेदभाव संपुष्टात येऊन समतावादी समाजरचना निर्माण होणे, हाच त्यांच्या स्वातंत्र्यसंकल्पनेचा केंद्रबिंदू होता.

नेताजींच्या सामाजिक जाणीवेची मुळे त्यांच्या बालपणातच रुजलेली दिसतात. ब्रिटिश सत्तेच्या अन्यायकारक धोरणांचा, भारतीयांवरील अपमानास्पद वागणुकीचा आणि देशातील दारिद्र्याचा त्यांनी प्रत्यक्ष अनुभव घेतला होता. शिक्षणाच्या काळात स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. आत्मगौरव, आत्मविश्वास, सेवा, त्याग आणि मानवतावाद या मूल्यांनी नेताजींच्या व्यक्तिमत्त्वाची घडण केली. आयसीएससारख्या सर्वोच्च सेवेत यश मिळवूनही त्या पदाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्यलढ्याचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ राजकीय नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि नैतिक धैर्याचा ठोस आविष्कार होता.

भारतीय समाजातील जातीय विषमता आणि अस्पृश्यता ही नेताजींसाठी अत्यंत वेदनादायी बाब होती. जन्माच्या आधारे माणसामाणसांत भेद करणे हे अमानवी असून राष्ट्राच्या एकात्मतेसाठीही घातक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. जातिव्यवस्थेमुळे समाजाचा मोठा वर्ग शिक्षण, रोजगार, सामाजिक सन्मान आणि मानवी हक्कांपासून वंचित राहिला होता. नेताजींनी या अन्यायाविरुद्ध केवळ शब्दांत नव्हे, तर कृतीतूनही संघर्ष केला. आजाद हिंद सेनेत जात, धर्म किंवा प्रांत यांचा कोणताही भेद न ठेवता सर्वांना समान संधी देण्यात आली. सैनिकांना एकाच पंक्तीत उभे राहून भोजन करणे, समान शिस्त पाळणे आणि एकाच ध्येयासाठी लढणे, ही सामाजिक समतेची जिवंत उदाहरणे होती.

स्त्री-सक्षमीकरण हा नेताजींच्या सामाजिक कार्याचा अत्यंत महत्त्वाचा आणि क्रांतिकारी पैलू होता. त्या काळातील भारतीय समाजात स्त्रियांना प्रामुख्याने दुय्यम आणि मर्यादित भूमिका दिली जात होती. मात्र नेताजींनी स्त्रियांकडे राष्ट्रनिर्मितीतील समान भागीदार म्हणून पाहिले. आजाद हिंद सेनेतील ‘राणी झाशी रेजिमेंट’ ही भारतीय इतिहासातील स्त्री-मुक्तीची ऐतिहासिक घटना होती. स्त्रियांना शस्त्र हातात घेऊन राष्ट्रासाठी लढण्याची संधी देणे म्हणजे केवळ लष्करी धोरण नव्हते, तर ते सामाजिक क्रांतीचे प्रतीक होते. नेताजींच्या मते, जो समाज आपल्या अर्ध्या लोकसंख्येला दुर्लक्षित ठेवतो, तो समाज कधीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि प्रगत होऊ शकत नाही.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये आर्थिक न्यायाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. ब्रिटिश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था शोषणावर आधारित होती. शेतकरी, कामगार आणि कष्टकरी वर्ग दारिद्र्य, कर्जबाजारीपणा आणि असुरक्षिततेच्या गर्तेत अडकलेला होता. नेताजी समाजवादी विचारसरणीने प्रभावित होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्यानंतर भारताने अशी आर्थिक व्यवस्था स्वीकारली पाहिजे, जिथे संपत्ती काही मोजक्या लोकांच्या हातात केंद्रित न राहता समाजाच्या सर्व घटकांच्या कल्याणासाठी वापरली जाईल. राज्याने लोककल्याणकारी भूमिका बजावून आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवाव्यात, अशी त्यांची भूमिका होती.

धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता हे नेताजींच्या सामाजिक कार्याचे अत्यंत महत्त्वाचे आधारस्तंभ होते. भारत हा विविध धर्म, भाषा आणि संस्कृतींचा देश आहे आणि ही विविधताच भारताची खरी ओळख आहे, असा त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांनी ‘फोडा आणि राज्य करा’ या धोरणातून धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण केली होती. नेताजींनी या धोरणाचा तीव्र विरोध केला. आजाद हिंद सेनेत हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन सर्वजण एकत्र येऊन ‘जय हिंद’चा नारा देत लढत होते. हा नारा केवळ युद्धघोष नव्हता, तर सामाजिक एकात्मतेचे आणि राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक होता.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, असे नेताजी ठामपणे मानत. ब्रिटिश शिक्षणपद्धती ही भारतीयांना मानसिक गुलामगिरीत ठेवणारी आहे, अशी त्यांची टीका होती. शिक्षणातून केवळ नोकरदार तयार न होता स्वाभिमानी, राष्ट्रभक्त आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले नागरिक घडले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. युवकांनी शिक्षणाचा उपयोग केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न करता समाजाच्या उन्नतीसाठी करावा, असा त्यांचा आग्रह होता.

नेताजींच्या सामाजिक विचारांमध्ये शिस्त, कर्तव्यभावना आणि नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व होते. त्यांच्या मते, स्वातंत्र्य म्हणजे केवळ अधिकार नव्हे, तर जबाबदाऱ्यांची जाणीवही आहे. आजाद हिंद सेनेतील कठोर शिस्त ही केवळ लष्करी गरज नव्हती, तर भावी भारतीय समाजासाठीचा नैतिक आदर्श होती. भ्रष्टाचार, स्वार्थ आणि नैतिक अधःपतन यांचा त्यांनी तीव्र निषेध केला.

युवाशक्तीवर नेताजींचा अपार विश्वास होता. युवक हे राष्ट्राचे खरे शिल्पकार असून सामाजिक परिवर्तनाची जबाबदारी त्यांच्यावरच आहे, असे ते मानत. भीती, न्यूनगंड आणि निष्क्रियता यांचा त्यांनी तीव्र निषेध केला. ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी, त्यागाची वृत्ती आणि राष्ट्रासाठी बलिदान देण्याची क्षमता हीच युवकांची खरी ओळख असावी, असा त्यांचा संदेश होता.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे सामाजिक कार्य आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटते. वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, स्त्री-असमानता, सामाजिक तणाव आणि सांप्रदायिकता यांसारख्या समस्या आजही आपल्या समाजासमोर उभ्या आहेत. अशा परिस्थितीत नेताजींचा समतावादी, शिस्तप्रिय आणि राष्ट्रकेंद्री दृष्टिकोन आपल्याला मार्गदर्शक ठरतो. त्यांच्या विचारांमध्ये केवळ संघर्षाची भाषा नाही, तर समाजबांधणीची स्पष्ट दिशा आहे.

२३ जानेवारी रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करताना त्यांच्या केवळ शौर्याचे नव्हे, तर त्यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाचे स्मरण करणे अत्यंत आवश्यक आहे. सामाजिक न्याय, समता, बंधुता, स्त्री-समानता, आर्थिक समतोल आणि मानवी प्रतिष्ठेवर आधारित भारत निर्माण करणे हेच नेताजींना खरे अभिवादन ठरेल. नेताजी हे इतिहासातील एक महान योद्धा नसून ते आजही भारतीय समाजाच्या आत्म्याला प्रेरणा देणारे जिवंत विचार आहेत.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल –




# नेताजी सुभाषचंद्र बोस देशाचे तेजोमय क्रांतीकारी योध्दा

भारत स्वातंत्र्य करण्यासाठी देशात दोन नद्यांचा उगम झाला. एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.२३ जानेवारी १८९७ला ओडिसा मधील कटक शहरात जन्माला आलेले नेताजी भारतासाठी चमकता तारा सिध्द झाले व स्वतंत्र भारतासाठी महान योध्दा म्हणून उदयास आले. नेताजींनी १५ वर्षाच्या वयातच स्वामी विवेकानंदांचे सर्व साहित्य वाचून काढले व देश निर्माण करण्याची ज्वाला प्रज्वलित झाली आणि देश स्वतंत्र करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी संघर्षाला सुरुवात केली.कोलकत्यातील जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक देशबंधू चित्तरंजन दास यांच्या कार्याने नेताजी प्रभावीत झाले व त्यांच्या सोबत काम करायला सुरुवात केली. २० जुलै १९२१ रोजी महात्मा गांधी व सुभाषचंद्र बोस सर्वप्रथम एकमेकांना भेटले.यावेळी गांधींजींनीसुध्दा नेताजींना दासबाबू सोबत काम करण्याचा सल्ला दिला.कारण चित्तरंजन दास हे बंगाली वकील व भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी पुढारी होते.त्यामुळे त्यांना देशबंधू असे संबोधले जात असे. १९२५ साली इंग्रजांच्या लक्षात आले की नेताजी क्रांतीकारकांशी संबंध ठेवतात व क्रांतीकारकांचे स्फुर्तीस्थान असल्याचे त्यांच्या लक्षात आले.ह्या कारणास्तव इंग्रज सरकारने सुभाषबाबूंना अटक केली व कोणताही खटला न चालवीता त्यांना अनिश्चित काळासाठी म्यांमारच्या कारागृहात बंदिस्त केले.नेताजींचा संपूर्ण प्रवास अत्यंत संघर्षमय व खडतड रहाला. कारण त्यांच्या व सहकाऱ्यांच्या रक्ताता-रक्तात स्वातंत्र्याची ज्वाला धगधगत होती.त्यांचे एकच स्वप्न होते ते म्हणजे भारत स्वतंत्र करणे यासाठीच त्यांनी विदेशी वारी करून इंग्रजाच्या दुश्मन राष्ट्रांशी हातमिळवणी करून भारतीय संघर्षाचा मोठा लढा आझाद हिंद सेनेच्या नेतृत्वात उभा केला. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र भारत उदयास आला. कारण इंग्रजांना देशातून पळवून लावण्यात आझाद हिंद सेनेचा मोठा वाटा आहे. आझाद हिंद सेनेची स्थापना पहिल्यांदा २९ आक्टोंबर १९१५ ला राजा महेंद्र प्रताप सिगं यांनी केली.त्यावेळी आझाद हिंद सरकारची सेना म्हणून ओळखली जायची.यांचा उद्देश भारताला इंग्रजांपासुन स्वतंत्र करने.जेव्हा दक्षिण-पूर्वी एशियामध्ये जापानच्या सहयोगाने नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ४० हजार भारतीय स्त्री-पुरूषांना प्रशिक्षीत करून सेनेत सहभागी केले त्याला सुद्धा आझाद हिंद फौज असे नाव देण्यात आल्यानंतर सुभाषचंद्र बोस यांना आझाद हिंद सेनेचा सर्वोच्च कमाण्डर नियुक्त केल्यानंतर आझाद हिंद सेनेची संपूर्ण कमान नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सोपविण्यात आली आणि सुभाषचंद्र बोस यांचा क्रांतीकारी लढा सुरू झाला. नेताजी १९३३ पासून १९३६ पर्यंत युरोपमध्ये रहाले.तो काळ जर्मनच्या हिटलरचा नाझीवाद आणि इटलीचे नेते मुसोलिनीचा फासीस्टवाद असा होता.यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सर्वतोपरी मदत करण्याचे वचन दिले.कारण या दोघांच्या निशाण्यावर इंग्लंड हाच देश होता. कारण इंग्लंडचे जगाच्या ७५ टक्के देशावर अधिपत्य होते. त्यामुळे इंग्लंडचा जगावर अतीरेक वाढत होता.कारण इंग्लंडने पहिल्या विश्व युध्दानंतर जर्मनीवर एकतर्फी करार लादण्यात आले होते.त्याचाच बदला जर्मनी इंग्लंड कडून घेणार होता. भारतावरसुध्दा इंग्रजांचे राज्य होते.त्यामुळे याच संधीचा फायदा घेण्याचे नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी मनात ठानले व नेताजींनी हिटलर व मुसोलिनी यांच्याशी हातमिळवणी केली. १९४३ मध्ये त्यांनी जर्मनीला सोडून ते जापानला जाऊन पोहोचले.जापानचे प्रधानमंत्री जनरल हिदेकी तोजो यांनी त्यांना सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. जापानमधून सिंगापूरला गेले. वयोवृध्द क्रांतीकारी रासबिहारी बोस ह्यांनी सिंगापूर येथील फेरर पार्कमध्ये भारतीय स्वातंत्र्य परिषदेचे नेतृत्व सुभाषबाबूंकडे सोपवीले.त्याचप्रमाणे सिंगापूर इथे कॅप्टन मोहन सिंग व्दारा स्थापित आझाद हिंद सेनेचीकमान आपल्या हाती घेतली.भारताला स्वतंत्र करण्यासाठी आझाद हिंद सरकारची स्थापना केली.तसेच आझाद हिंद सेना गठीत केली.या संघाचे प्रतीक चिन्ह असलेल्या झेंड्यावर डरकाळी मारणाऱ्या वाघाचे चित्र होते.कारण नेताजींची संपूर्ण कार्यशैली वाघासारखीच होती.आझाद हिंद सेनेने १८ मार्च १९४४ रोजी भारतभूमीत प्रवेश केला व माऊडॉक येथे त्यांनी भारताचा तिरंगा फडकावला. नेताजी ४ जुलै १९४४ ला बर्मा पोहचले. तेथुनच त्यांनी भारतीयांसाठी नारा दिला तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दुंगा.१९३९ ला गांधी विचारधारेला हरवुन नेताजींची काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली.यावर महात्मा गांधी म्हणाले की सुभाषचंद्र बोस यांचा विजय व माझा पराजय आहे.गांधीजींच्या या वक्तव्याने व विचारांमुळे सुभाषचंद्र बोस यांचे मन दुः खावले व स्वत:हुन काँग्रेस सोडली. कारण महात्मा गांधी मवाळवादी तर सुभाषचंद्र बोस जहालवादी विचारांचे होते.परंतु दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता.१९४४ मध्ये अमेरिकन पत्रकार लुई फिशर ह्यांच्याशी चर्चा करतांना महात्मा गांधींनी नेताजींना देशभक्तांचा देशभक्त असा उल्लेख केला होता.


तर ४ जुन १९४४ ला सिंगापूरवरून एक संदेश देतांना सुभाषचंद्र बोस यांनी महात्मा गांधी यांना राष्ट्रपिता महात्मा गांधी म्हणुन संबोधले तेव्हा पासून महात्मा गांधींना राष्ट्रपिता संबोधल्या जावु लागले.त्यामुळे महात्मा गांधींनी अहिंसेचा मार्ग अवलंबला तर नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी क्रांतीकारीचा मार्ग अवलंबला. दोघांचाही लढा भारत स्वातंत्र्यासाठीच होता. त्यामुळेच १५ ऑगस्ट१९४७ ला भारत स्वतंत्र झाला.१८ ऑगस्ट १९४५ ला भारतासाठी दु:खद समाचार आला नेताजी सुभाषचंद्र बोस टोकियोला जातांना तैवान येथील तैहोको जवळ हवाई दुर्घटने दरम्यान नेताजींचा मृत्यू झाला व त्यांचे स्वप्न अधुरे रहाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण देश स्तब्ध झाला. परंतु त्यांचे मृत शरीर अजुनही मिळाले नाही.म्हणुनच नेताजींच्या मृत्युच्या कारणांवर आज देखील विवाद सुरू असल्याचे दिसून येते.आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी आपली वाममार्गाने कमवीलेली संपूर्ण धनसंपत्ती देशहितासाठी स्वखुशीने खर्च केली तर ही खरी देशभक्ती ठरेल व नेताजींना खरी आदरांजली समजल्या जाईल.आजच्या युवा पिढीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे आचार-विचार जागृत होने गरजेचे आहे.कारण देश निर्माण,देशाची प्रगती,देशाचा विकास नेताजींच्या विचारांनीच जलदगतीने पुढे जावु शकतात.त्याच बरोबर मी देशवासियांना आग्रह करेल की नेताजींच्या१२९ व्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावावेत व देशात १२९ कोटी वृक्ष एकाच दिवशी लावण्याचा संकल्प सरकारनी, संघटनांनी व जनतेनी घ्यावा.यामुळे संपूर्ण भारत निसर्ग रम्य होवून प्रदूषणावर मात करण्यात आपण यशस्वी होवू.सुभाषचंद्र बोस यांच्या १२९ व्या जयंती निमित्त कोटी कोटी प्रणाम!जय हिंद!

**– रमेश कृष्णराव लांजेवार,** ( स्वतंत्र पत्रकार ) मो.

# क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस

स्वातंत्र्य चळवळीतील थोर क्रांतिकारक नेते आझाद हिंद सेनेचे सरसेनापती सुभाषचंद्र बोस यांची उद्या म्हणजे २३ जानेवारी रोजी जयंती आहे. २३ जानेवारी १८८७ रोजी कटक येथे नेताजींचा जन्म झाला. नेताजींना आठ भावंडे होती. नेताजी लहानपणापासूनच बंडखोर प्रवृत्तीचे होते. वयाच्या १५ वर्षीच नेताजींनी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. पण त्यांना गुरू दर्शन झाले नाही म्हणून त्यांनी स्वामी विवेकानंद यांचे साहित्य वाचून त्यांना गुरू बनवले. कॉलेजमध्ये असताना एका इंग्रज शिक्षकाने भारतीयांना दूषणे दिली तेंव्हा नेताजींनी उभे राहून त्या शिक्षकाला जाब विचारीत निषेध नोंदवला. इतकेच नाही तर त्या शिक्षकावर कारवाई व्हावी यासाठी कॉलेजमध्ये बंद पुकारला याचा राग मनात धरून कॉलेज प्रशासनाने त्यांना कॉलेजमधून काढून टाकले. १९२१ साली इंग्लंडला जाऊन नेताजींनी इंडियन सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा दिली त्यात ते चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नेताजींनी काहीकाळ सिव्हिल सर्व्हीसमध्ये नोकरी देखील केली. पण भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी त्यांनी सिव्हिल सर्व्हिसच्या नोकरीवर पाणी सोडले. तेंव्हा गांधीजींची असहकार चळवळ जोरात सुरू होती. असहकार चळवळ समजून घेण्यासाठी व स्वातंत्र्य चळवळीची पुढील दिशा ठरवण्यासाठी त्यांनी गांधीजींची भेट घेतली. महात्मा गांधींनी त्यांना चित्तरंजन दास यांच्याकडे पाठवले. चित्तरंजन दास हे त्यांचे राजकीय गुरू बनले. इंग्लंडची राणी कोलकोत्याच्या दौऱ्यावर येणार आहे हे समजल्यावर नेताजींनी या दौऱ्यावर बहिष्कार टाकण्याची योजना आखली. इंग्रजांना त्याची कुणकुण लागताच त्यांनी नेताजी आणि चित्तरंजन दास यांना अटक केली. सहा महिने त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना त्यांनी इतिहास, धर्मशास्त्र आणि मानसशास्त्र या विषयांचे वाचन केले. तुरुंगातून मुक्त झाल्यावर त्यांनी भारतातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला आणि ते राजकारणात सक्रिय झाले. ते बंगाल प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष बनले. पुढे त्यांनी इंडिया इंडिपेंडन्स युथ लीगची स्थापना करुन तरुणांना संघटित केले. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या आंदोलनात नेताजींना पुन्हा अटक झाली. गांधी आयर्विन करारानंतर त्यांची मुक्तता झाली. ते कोलकोत्याचे महापौर बनले. गांधी आयर्विन कराराला नेताजींनी विरोध केला त्यामुळे त्यांचे महात्मा गांधीशी मतभेद झाले. १९३२ साली सशस्त्र क्रांतिकारी संघटनेशी संबंध जोडून त्यांना अटक करण्यात आली. पण प्रकृतीच्या कारणावरून त्यांना तुरुंगात न ठेवता देशातून हद्दपार करण्यात आले. तीन वर्ष ते व्हिएन्ना येथे राहिले. तिथे त्यांनी युरोपातील राजकीय परिस्थितीचा अभ्यास केला. १९३७ साली गांधीजींच्या विरोधाला न जुमानता त्यांनी त्रिपुरा काँग्रेस अधिवेशनात अध्यक्षपदाची निवडणूक लढवली. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत त्यांनी पट्टाभीसीतारामय्या यांचा पराभव केला. या निवडणुकीमुळे महात्मा गांधी नाराज झाले. हा आपलाच पराभव आहे असे ते मानू लागले. बहुसंख्य काँग्रेसजनांनी गांधीजींचेच नेतृत्व मान्य केले. त्यामुळे नेताजींनी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन फॉरवर्ड ब्लॉक या पक्षाची स्थापना केली. नागपूर अधिवेशनात अस्थायी राष्ट्रीय सरकार स्थापन करण्याची मागणी करण्यात आली. पण संकल्पित सत्यागृहापूर्वीच त्यांना अटक करण्यात आली. अटक केल्यानंतर नेताजींनी अन्नत्याग करु अशी धमकी दिली. या धमकीला घाबरून इंग्रजांनी त्यांना तुरुंगात न ठेवता त्यांच्या घरीच नजरकैदेत ठेवले. नजरकैदेत असतानाच त्यांनी वेषांतर करुन पेशावर गाठले तेथून ते जर्मनीला गेले. जर्मनीत त्यांनी भारतीयांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रवृत्त केले. त्यांनी तेथील भारतीयांना संघटित केले. जर्मनीमध्ये ते एडॉल्फ हिटलरला भेटले. बर्लिनमध्ये त्यांनी आझाद हिंद रेडिओ व फ्री इंडिया सेंटरची स्थापना केली. १९४३ ला नेताजींना जपानवरून आमंत्रण आले. जर्मनीहून जपान व्हाया मादागास्कर असा सबमरीन प्रवास करीत ते जपानला पोहचले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी त्यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सरकारची स्थापना केली. नेताजी स्वतः राष्ट्रप्रमुख, पंतप्रधान, संरक्षण मंत्री व सरसेनापती बनले. या राष्ट्राला जपान, जर्मनी, ब्रह्मदेश, इटली यासह ११ देशांनी मान्यता दिली. नेताजींनी तरुणांना आझाद हिंद सेनेत सहभागी होण्याचे आव्हान करीत तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा...अशी घोषणा केली. त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत हजारो तरुण आझाद हिंद सेनेत सामील झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात आझाद हिंद सेनेने जपानी लष्कराच्या साहाय्याने भारतावर आक्रमण केले. दोन्ही फौजांनी इंग्रजांकडून अंदमान निकोबार बेटे जिंकली. ब्रह्मदेशमधून आझाद हिंद सेनेच्या फौजा भारताकडे निघाल्या मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे आझाद हिंद सेनेला माघार घ्यावी लागली. रंगून आकाशवाणी वरुन नेताजींनी भाषण करुन इंग्रजांशी कोणत्याही प्रकारचा समजोता न करण्याचे, फाळणी न करण्याचे लढा चालूच ठेवण्याचे आव्हान केले. महायुद्धात जर्मनी, इटली यांचा पराभव झाला. जपानने शरणागती पत्करली तेंव्हा नेताजींनी रशियाला जाण्याचा निर्णय घेतला. १८ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजी विमानातून माणचुरीयाच्या दिशेने जात होते. प्रवासादरम्यान त्यांचे विमान बेपत्ता झाले. २३ ऑगस्ट १९४५ रोजी जपानच्या दोनयी वृत्तसंस्थेने जगाला कळवले की १८ ऑगस्ट रोजी नेताजींच्या विमानाला अपघात झाला त्यात नेताजींचे निधन झाले. १९९२ साली भारत सरकारने नेताजींना मरणोत्तर भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देण्याची घोषणा केली पण मृत्यूबाबत कोणताही पुरावा उपलब्ध नसल्याने त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देणे अवैध आहे असे म्हणत त्यांच्या कुटुंबीयांनी हा पुरस्कार नाकारला. तुम मुझे खून दो... मै तुम्हे आझादी दुंगा... असा नारा देत भारतीयांमध्ये स्वातंत्र्य लढ्याची चेतना निर्माण करणाऱ्या नेताजींना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**– श्याम बसप्पा ठाणेदार,** दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५



# हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांचा ३५० वा शहीदी समागम

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**
सामाजिक एकोपा, धर्म रक्षणासाठी शहादत देणाऱ्या गुरु तेग बहादुरांना हिंद दी चादर अशी पदवी आहे. त्यांचे जीवन हे समाजाच्या रक्षणासाठी वाहिले. तत्कालीन शासनांकडून समाजावर होत असलेल्या अन्यायपूर्ण वागणुकीचा सामोपचार ज्या पत्राने झाला ते पत्र 'जफरनामा' म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. हाच जफरनामा तत्कालिन मुगल बादशाह औरंगजेब यांच्याकडे देण्यासाठी म्हणून छत्रपती संभाजीनगर या शहरात आणला गेला होता. आजही त्याची हस्तलिखित प्रत येथील भाई दयासिंग, भाई हरिसिंग गुरुद्वाऱ्यात संग्रहित आहे.एक प्रकारे मानव मुक्तीचा जाहीरनामा असलेला हा जफर नामा म्हणजे गुरु तेग बहादुर साहेब यांचे सुपूत्र गुरु गोविंद सिंग यांनी मुगल बादशाह औरंगजेबाला लिहिलेले एक पत्र होय.नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी रोजी होऊ घातलेल्या हिंद दी चादर गुरु तेग बहादुर यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. देश विदेशातील भाविक या ठिकाणी येणार आहे. त्याअनुषंगाने गुरु तेग बहादुर यांच्या कार्याला उजाळा दिला जात आहे.

याबाबत भाई दयासिंग, भाई हरिसिंग गुरुद्वाराचे सदस्य सरदार हरिसिंग यांनी माहिती दिली. त्यानुसार, 'जफर नामा' म्हणजे विजयाचे पत्र. मुगल बादशाह औरंगजेब याने शिखांवर अनन्वित अत्याचार केले. त्याविरोधात हे एक प्राणांतिक आंदोलन होते. जिझिया करा द्वारे अन्य धर्मियांचे कर रुपात शोषण होत होते. त्यास प्रतिकार करणाऱ्यांना प्राणांची आहुती द्यावी लागे. त्यासाठी गुरु तेग बहादुर यांनी आपल्या शिष्यांसह शहादत दिली. तो एक मोठा रोमांचक इतिहास आहे. शिखांची बलिदानाची परंपरा अधोरेखित करणारी ही घटना होय.

त्याच गुरु तेग बहादुर यांचे पुत्र गुरु गोविंदसिंह यांनी याबाबत औरंगजेबाला पत्र लिहिले. हे पत्र जफरनामा म्हणून प्रसिद्ध आहे. या पत्राचे महत्त्व खूप आहे. हेच ते पत्र जे औरंगजेबाच्या कृत्यांची श्वेत पत्रिका म्हणूनही ओळखले जाते. हे पत्र वाचून औरंगजेबाला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. त्याचे हृदय परिवर्तन झाले. त्यानंतर त्याने अन्याय अत्याचाराला चालना देणारे कायदे रद्द करण्याचे फर्मान जारी केले. या शिवाय गुरु गोविंदसिंगांना पकडण्याचा कुणीही प्रयत्न करु नये. त्यांना त्रास देऊ नये त्यांना सहाय्य करावे, असेही हुकूम जारी केले. इतकेच नव्हे तर त्याने गुरु गोविंदसिंग यांना भेटण्याची इच्छाही व्यक्त केली. मात्र ही त्याची इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. कारण ही घटना इ.स. १७०७ मधिल आहे. हेच वर्ष औरंगजेबाच्या आयुष्याचे शेवटचे वर्ष ठरले.



जफरनामा आणि छत्रपती संभाजीनगरचे अत्यंत महत्त्वाचा संबंध आहे. हे पत्र गुरु गोविंदसिंगांनी लिहिल्यानंतर ते औरंगजेब पर्यंत पोहोचवायचे होते. त्यावेळी औरंगजेब मराठा साम्राज्याचा बिमोड करण्याच्या इच्छेने महाराष्ट्रात तळ ठोकून बसला होता. गुरु गोविंद सिंग यांचे दोन शिष्य भाई दयासिंग आणि भाई धरमसिंग हे पत्र घेऊन औरंगजेबाचे दक्षिणेतील महत्त्वाचे शहर म्हणून छत्रपती संभाजीनगरला (त्यावेळचे औरंगाबाद) आले. येथे येऊन त्यांनी मुगल बादशाहच्या भेटीचा प्रयत्न केला. नेमका त्यावेळी औरंगजेब बादशाह अहिल्यानगर (त्यावेळचे अहमदनगर) मुक्कामी होता. या दोघां शिष्यांनी इथूनच अहमदनगरकडे कूच केले. औरंगजेबाला भेटून आपल्या गुरुंचे पत्र सुपूर्द केले.

फार्सी भाषेत व लिपीत हे पत्र छंदबद्ध काव्य पद्धतीने लिहिले आहे. त्यात शिखांवर झालेल्या अन्याय, अत्याचाराचे वर्णन आहे आणि काहीही झाले तरी आम्ही अन्याय सहन करणार नाही असा निर्धारही आहे. एखाद्या संताने राज्यकर्त्याला खडे बोल सुनावले आहेत. हे पत्र अर्थात जफरनामा औरंगजेबाने वाचला. वाचून त्याला केलेल्या कृत्याचा पश्चाताप झाला. आपल्या आयुष्याच्या अखेरीची चाहूल त्याला लागली होती. त्याने तात्काळ फर्मान जारी करुन सर्व अत्याचार थांबविण्याचे आदेश दिले.

हे पत्र शीख धर्माच्या पवित्र अशा दशमग्रंथ या ग्रंथात समाविष्ट करण्यात आले आहे. आजही छत्रपती संभाजीनगरच्या धावणी मोहल्ला, शहागंज येथील भाई दयासिंग, भाई धरमसिंग या गुरुद्वाऱ्यात संग्रहित ठेवण्यात आले आहे. हे पत्र आजही पाहता येते. विशेष म्हणजे हाच गुरुद्वारा दक्षिण भारतातील पहिला गुरुद्वारा मानला जातो. देशभरातील भाविक येथे माथा टेकण्यासाठी आवर्जून येतात, अशी माहिती या गुरुद्वाराचे सदस्य सरदार हरिसिंग यांनी दिली.

# पैठण पोलिसांची धडाकेबाज कामगिरी: किराणा सामानाच्या आड लपवलेला लाखो रुपयांचा गुटखा जप्त!

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपळवाडी (प्रतिनिधी)**
छत्रपती संभाजीनगर-पैठण रोडवर एम.आय.डी.सी. पैठण पोलिसांनी मोठी कारवाई करत गुटख्याची अवैध वाहतूक उघडकीस आणली आहे. किराणा सामानाच्या नावाखाली चाललेल्या या काळया धंद्याचा पोलिसांनी पर्दाफाश केला असून, २ लाख १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल गाडीसह जप्त केला आहे.२० जानेवारी २०२६ रोजी एम.आय.डी.सी. पैठण पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांना गुप्त माहिती मिळाली की, छत्रपती संभाजीनगरकडून पैठणकडे जाणाऱ्या एका 'जितु' मालवाहू गाडीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित गुटखा लपवून नेला जात आहे. माहिती मिळताच वेळ न घालवता सपोनि जगदाळे यांनी तत्काळ पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी पैठण रोडवर सापळा रचला. संशयास्पद वाहन येताच पोलिसांनी ते थांबवले. गाडीचालक नागेश रामनाथ लांडे (वय ३३ वर्षे, रा. पाटेगाव, ता. पैठण) याला सामानाबाबत विचारले असता, त्याने गाडीत फक्त किराणा सामान असल्याचे सांगून पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.

पोलिसी खाक्या दाखवताच बिंग फुटले!

वरवर पाहता गाडीत किराणा सामानच दिसत होते, मात्र चालकाच्या संशयास्पद हालचालींमुळे पोलिसांना संशय आला. पोलिसांनी गाडीतील सामान खाली उतरवून कसून तपासणी केली असता, किराणा सामानाच्या खाली लपवलेले गुटख्याचे पोते आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी गुटखा




आणि मालवाहू वाहन असा एकूण २ लाख १९ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**आरोपीला एक दिवसाची पी.सी.आर.**

याप्रकरणी आरोपी नागेश लांडे याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपीला एक दिवसाची पोलीस कोठडी (PCR) सुनावली आहे. या तस्करीच्या मागे अजून कोणाचे हात आहेत? हा माल कोठून आला आणि कुठे जाणार होता? याचा तपास पोलीस करत असून लवकरच मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.ही धडाकेबाज कामगिरी पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, विभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ईश्वर जगदाळे, पोउपनि बुरकुल, पोकॉ/२३७ गुडेकर, पोकॉ/२३५ उगले यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## पैसे घेऊन टीकीट वाटले काँग्रेस च्या कार्यालयात राडा



**आत्ताच एक्सप्रेस**
**फुलंब्री/प्रतिनिधी/ सरफराज पटेल** / पैसे घेऊन तिकीटे वाटल्याचा आरोप करत निष्ठावंत कार्यकर्त्यांनी खा. कल्याण काळे यांच्या फुलंब्रीच्या जनसंपर्क कार्यालयात , २१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास मोठा राडा केला. जोरदार घोषणाबाजी करून परिसर दणाणून सोडला. पक्षातील अंतर्गत गटबाजी अशी चव्हाट्यावर आली आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.पाल जिल्हा परिषद गटासाठी युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष वरुण पाथ्रीकर आग्रही होते. त्यांना डावलण्यात आल्यानंतर त्यांनी त्याच्या पत्नीची उमेदवारी शरद पवार गटाकडून दाखल केली. काही प्रत्यक्षदर्शींच्या मते, कार्यकर्त्यांनी केवळ घोषणाबाजीच नाही तर कार्यालयातील फर्निचर, खुर्चा आणि टेबलांचीही तोडफोड केली. मात्र पक्षाच्या सूत्रांनी सांगितले, की केवळ घोषणाबाजी केली आणि वरुण पाथ्रीकर यांनी स्वतःच खासदारांचे बंधू जगन्नाथ काळे आणि तालुका काँग्रेस अध्यक्ष संतोष मेटे यांना आपल्या वाहनातून तिथून नेले. मात्र नेत असतानाही कार्यकर्त्यांनी गाडीला घेराव घालून घोषणाबाजी केली. यावेळी प्रचंड लोटालाटही करण्यात आली. काँग्रेस संपवण्याचं काम सुरू असल्याचा संताप कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# संक्षिप्त

## बाळापूरचे तीन जवान सैन्यात दाखल !



**आत्ताच एक्सप्रेस**
**धर्माबाद/ प्रतिनिधी. गंगाप्रसाद सोनकांबळे/** नुकत्याच जाहीर झालेल्या सैन्यदलातील निवड यादीमध्ये बाळापूर नगरीतील तीन भूमिपुत्रांनी बाजी मारली आहे, श्रीनिवास बासरोड यांची (उठझऋ), लोकेश पलीकोंडावार (उखडऋ) तर राहुल घाटे यांची इडऋ मध्ये निवड झाली आहे. ही निवड केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाचे प्रतीक नाही, तर त्यांच्या कठीण परिस्थितीतून त्यांनी दाखवलेला धैर्य आणि आत्मविश्वास आहे,घरची परिस्थिती साधारण असताना सुद्धा या तरुणांनी शिक्षण सोडले नाही; मनात असलेली जिद्द,कष्ट आणि धैर्याने त्यांनी आपले स्वप्न साकार केले आहे.

गावकऱ्यांनी तरुणांच्या यशावर प्रचंड आनंद व्यक्त केला असून, हे यश संपूर्ण बाळापुरसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या मेहनत, जिद्द, धैर्य आणि कुटुंबीयांच्या अपार संघर्षामुळे त्यांनी दाखवलेला आदर्श गावातील प्रत्येक तरुणासाठी मार्गदर्शक ठरेल. त्यांच्या या यशाबद्दल कुटुंबीय,नातेवाईक,गावातील शिक्षक, मित्रपरिवार आदी स्तरावून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## नांदेडमध्ये २४ व २५ जानेवारीला वाहतूक बदल

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड/ प्रतिनिधी/** शहरातील मोदी मैदान येथे २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित 'हिंद-दी-चादर' या विशेष कार्यक्रमासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्याने शहरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक नियमन लागू करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी खालील व्हीव्हीआयपी (VVIP) मान्यवर नांदेडमध्ये दाखल होत आहेत.अमित शाह (केंद्रीय गृहमंत्री),देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री, महाराष्ट्र),योगी आदित्यनाथ (मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश),श्रीमती रेखा गुप्ता (मुख्यमंत्री, दिल्ली),नायब सैनी (मुख्यमंत्री, हरियाणा),भगवंत मान (मुख्यमंत्री, पंजाब) वाहतुकीसाठी बंद असणारे मार्ग (सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत) पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिलेल्या आदेशानुसार, सुरक्षेच्या कारणास्तव खालील मार्ग तात्पुरते बंद राहतील: १. आसना ब्रिज - शंकरराव चव्हाण चौक - गुरुद्वारा मालटेकडी रोड - मालटेकडी ओव्हरब्रिज. २. नमस्कार चौक ते नाईक चौक आणि अण्णाभाऊ साठे पुतळा परिसर. ३. हिंगोली गेट ओव्हरब्रिज आणि अंडरब्रिज, चिखलवाडी चौक. ४. आय.टी. आय. ते अण्णाभाऊ साठे पुतळा आणि आनंदनगरकडे जाणारा मार्ग. ५. चिखलवाडी ते गुरुद्वारा हनुमान मंदिर - भगतसिंग चौक. ६. बर्की चौक ते जुना मोंढा मार्गे वजिराबाद. ७. कौठा परिसर: कविता हॉटेल ते जुना मोंढा आणि एम.जी. हेक्टर शोरूम ते साई कमान. ८. बसवेश्वर पुतळा ते अहिल्याबाई होळकर चौक - पदमजा सिटी नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने खालील पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.चिखलवाडी ते नाईक चौककडे जाणारी वाहतूक: छत्रपती शिवाजी महाराज पुतळा - कोर्टाच्या पाठीमागून हिंगोली गेट अंडरब्रिज मार्गे गोकुळनगर इतर सुरू राहणारे मार्ग: वजिराबाद चौक - आय.टी.आय. - नवीन मोंढा - महादेव दाल मिल मार्ग, रेल्वे स्टेशन परिसर, बसवेश्वर चौक ते लातूर फाटा आणि लिंबगाव - भवानी चौक.देश-विदेशातून येणारे भाविक आणि अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या दौऱ्यामुळे वाहतूक कोंडी टाळण्यासाठी हे बदल करण्यात आले आहेत. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे आणि जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचाच वापर करावा. - अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड.

## जोरदार शक्ती प्रदर्शन करीत लासूरगाव जिल्हा परिषद गटासाठी कल्पना कचरू डिके यांनी भरला उमेदवारी अर्ज

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर वैजापूर लासुरगाव जिल्हा परिषद गटातून भरला निवडणूकीचा उमेदवारी अर्ज हे शक्तिप्रदर्शन नसून ही जनतेची साथ आहे. त्याच,बळावर आम्ही जनतेची कामे करू व जनतेचे सेवा करण्याची संधी मिळावी अशी प्रतिक्रिया नामनिर्देशन पत्र भरल्यानंतर माध्यमांशी बोलताना कल्पना कचरू डिके यांनी दिली. दरम्यान जळगाव शहराचे इच्छुक उमेदवार कल्पना पाटील डिके यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करत अर्ज दाखल केला जिल्हा परिषद निवडणुकीचा बिगुल वाजला असून इच्छुक उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया चालू झाली असून वैजापूर तालुक्यातील लासूरगाव जिल्हा परिषद गटातून भाजपच्या कल्पना कचरू पाटील डिके यांनी आपला उमेदवारी अर्ज मंगळवारी निवडणूक निर्णय अधिकारी अरुण जऱ्हाड यांच्याकडे दाखल केला.




दरम्यान लासूरगाव,दहेगाव येथून अरुण पाटील डिके,वेदांत डिके यांच्या मित्रमंडळाच्या नेतृत्वाखाली मोटरसायकल व चारचाकी रॅली काढत भव्य शक्तीप्रदर्शन करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष सहकार आघाडी तथा जिल्हा दूध संघाचे संचालक कचरू आण्णा डिके पाटील, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कन्नड न.परिषदेच्या उपनगराध्यक्षा पदी सौ. रंजनाताई झाल्या विराजमान

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड /उदय कुलकर्णी/** नुकत्याच पार पडलेल्या कन्नड न.परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी (अजित पवार ) गटातून निवडून आलेल्या सौ.रंजनाताई राठोड यांची पक्षाचे वतीने उपनगराध्यक्ष पदी एक मताने निवड झाली असुन त्यांनी दि.१९ रोजी सदर पदाची सूत्रे आपल्या हाती घेतली आहे.



यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी रवींद्र लांडे,मा. नगराध्यक्षा सौ.स्वातीताई कोल्हे,मा.गटनेते तथा न.प.देचे स्वीकृत नगरसेवक संतोष कोल्हे,नगरसेवक राहुल वाघ,सौ. सोनाली सुनील पवार,सौ. सुनिताताई डोळस,सुरेश डोळस,उपमुख्यधिकारी विष्णू राठोड,कार्यालय अधीक्षक प्रशांत देशपांडे,कर निरीक्षक भाग्यश्री बेगडे सह पक्षाचे नगरसेवक,पदाधिकारी न.परिषदेचे अधिकारी,कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी बोलतांना सौ.रंजनाताई म्हणाल्या की,शहरातील नागरिकांच्या मुख्यत्वा सर्व मूलभूत सुविधासाठी व शहर विकासासाठी मी आज पासूनच माझे सहकारी व प्रशासनाच्या अधिकारी वर्गाशी समन्वय ठेऊन २४ तास माझ्या पदाचा वापर करेल असे सूचित केले.

## विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांचा पूर्णा रेल्वे स्थानकावर पाहणी दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड/ प्रतिनिधी/** नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी बुधवार, दिनांक २१ जानेवारी २०२६ रोजी पूर्णा रेल्वे स्थानकास तपासणी दौरा केला. या दौऱ्यादरम्यान त्यांनी रेल्वेच्या विविध महत्त्वाच्या सुविधा तसेच सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली.

या पाहणीदरम्यान कामले यांनी पूर्णा येथील क्रू लॉबी व रनिंग रूमची तपासणी करून कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध सुविधा, स्वच्छता व कार्यपद्धतीचा आढावा घेतला. तसेच अपघात निवारणासाठी सज्ज असलेल्या ART (अपघात मदत गाडी) आणि SPMRV (स्वयंप्रेरित वैद्यकीय मदत वाहन) यांच्या स्थितीची पाहणी करून आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

याशिवाय, पूर्णा रेल्वे स्थानकावर 'अमृत स्टेशन' योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करण्यात आली. प्रवाशांच्या सोयीसुविधा, कामांची गुणवत्ता व प्रगती यांचा आढावा घेत कामे वेळेत व दर्जेदाररीत्या पूर्ण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.या दौऱ्यावेळी नांदेड विभागातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नांदेड विभाग प्रवासी सुविधा, सुरक्षितता आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी सातत्याने कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय**
**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**
**ई-मेल -** aurangabad.eemahapwd.gov.in **दुरध्वनी ०२४०-२३३१०२२**

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०२४/प्र.क्र.१४४/इमा-२**
**दिनांक - २८/०२/२०२४**
**ई निविदा सूचना क्रं. ३७४ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर (दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे. खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) http://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)
३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक
जिमाका/छ. स.न. जाहि/५२७ /२०२५-२०२६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

**छत्रपती संभाज छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**
**पशुसंवर्धन विभाग**
मुख्य कार्यालय पी.बी.एक्स. ०२४०-२३३३५३६-४० Email: csmsahdgmail.com
जा.क्र/मनपा/पवैअ/ २०/१२०२६ दिनांक: २२/०१/२०२६

**जाहीर आवाहन**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, जे नागरीक श्वान प्रेमी संस्था/संघटना श्वानाबाबत काम करू इच्छितात त्यांनी खालील बाबीं विषयी महानगरपालिकेस सहकार्य करावे, ही विनंती.
१. मनपा धान निवारागृह येथे असेलेले श्वान / पिल्ले धानाचे पालकत्व स्विकारणे / दत्तक घेणे.
२. श्वान निवारागृह येथे असलेले मोकाट धानानां खाद्य खाऊ घालणे / अन्न धान्य साहित्य अन्नदान करणे.
३. मोकाट श्वानाचे निर्बिजीकरण संख्या वाढवण्यासाठी मदत करणे, ज्यामध्ये छत्रब्ज मार्फत पकडण्यात आलेले मोकाट श्वान महानगरपालिकेकडे स्वाधीन केले जातील.
मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीत मोकाट श्वानावाबत हेल्पलाईन क्र. ९४२१६६४५१४ अथवा csmsahdgmail.com या ईमेल व्दारे संपर्क करावा.

**स्वाक्षरीत**
**(कल्पिता पिंपळे)**
**अतिरिक्त आयुक्त - २**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

# निरंकारी संत समागम २४ जानेवारीपासून सांगलीत होणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** प्रेम, सेवा आणि एकतेच्या पवित्र भावनांनी भरलेला महाराष्ट्राचा ५९ वा निरंकारी संत समागम २४ ते २६ जानेवारी २०२६ दरम्यान सांगली येथे परमपूज्य सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या दिव्य उपस्थितीत श्रद्धेने आणि भव्यतेने आयोजित केला जाईल. या तीन दिवसांच्या भव्य कार्यक्रमाची तयारी आता अंतिम टप्प्यात आहे, जिथे समर्पित भक्त आणि निरंकारी स्वयंसेवक पूर्ण भक्ती, शिस्त आणि निस्वार्थ सेवेसह, स्थळाला एक सुव्यवस्थित, सुसज्ज आणि अत्यंत आकर्षक स्वरूप देत आहेत.हे संत संमेलन महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील सांगलवाडी येथील सुमारे ४०० एकरच्या विशाल आणि भव्य परिसरात आयोजित केले जाईल. या दिव्य कार्यक्रमांतर्गत, मुख्य सत्संग कार्यक्रम दररोज दुपारी २:३० वाजता सुरू होईल, ज्यामध्ये देश-विदेशातील संत, वक्ते, गीतकार आणि कवी त्यांच्या भक्ती, विचार आणि रचनांद्वारे देव आणि सत्गुरूंबद्दलच्या भावनिक अभिव्यक्ती सादर करतील. प्रत्येक दिवसाची सांगता रात्री ९:०० वाजता सत्गुरु माता सुदीक्षा जी महाराजांच्या



पवित्र आणि प्रेरणादायी आशीर्वादाने होईल, जे सर्व भक्तांसाठी आध्यात्मिक मार्गदर्शनाचा स्रोत बनेल.

या वर्षी महाराष्ट्राच्या प्रांतीय संत संमेलनाची संकल्पना आत्मा-मंथन अशी निश्चित करण्यात आली आहे, जी संपूर्ण संमेलनाला आत्म-साक्षात्कार, आत्म-शुद्धीकरण आणि मानवी मूल्यांच्या जागरणाकडे एक खोल आणि अर्थपूर्ण आध्यात्मिक प्रवाह प्रदान करते.गेल्या महिनाभरात, महाराष्ट्रासह विविध राज्यांतील भक्तांच्या निस्वार्थ आणि निस्वार्थ सेवेमुळे हे संमेलनस्थळ एका सुव्यवस्थित, भव्य आणि सुंदर छताच्या शहरात रूपांतरित झाले आहे. सर्व वयोगटातील भक्त, सद्गुरुंच्या अमूल्य शिकवणी आत्मसात करून, पूर्ण भक्ती, शिस्त आणि आध्यात्मिक आनंदाने सतत सेवेत गुंतलेले आहेत. सेवेचा हा सुंदर आणि प्रेरणादायी प्रकार सामान्य लोकांसाठी एक उदाहरण बनला आहे. भक्ती, प्रेम आणि समर्पणाने भरलेल्या अंतःकरणाने केलेल्या या सेवा एक अद्वितीय दृश्य सादर करतात, ज्याचा अनुभव निःसंशयपणे शब्दांच्या पलीकडे आहे.

सांगली-मिरज महानगरातील रस्त्यांवर आणि परिसरात आयोजित पथनाट्ये, बॅनर आणि खुल्या सत्संगांच्या माध्यमातून मानवतेच्या कल्याणासाठी आयोजित केलेल्या या दिव्य कार्यक्रमात जनतेला सहभागी होण्याचे आवाहन केले जात आहे; अधिकाधिक संत आणि भक्त या आध्यात्मिक उत्सवात सामील व्हावेत आणि निरंकाराचे आश्रय घेऊन त्यांचे जीवन अर्थपूर्ण करावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत.मेळाव्याला येणाऱ्या लाखो भाविकांना सामावून घेण्यासाठी, निवास तंबू, एक मोठी लंगर व्यवस्था, एक कॅन्टीन, एक दवाखाना, सुरक्षा व्यवस्था, सुव्यवस्थित पार्किंग आणि रेल्वे स्टेशन आणि बस टर्मिनलपासून पुरेशी वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे. मेळाव्याच्या परिसरात स्वच्छता आणि सुव्यवस्था राखण्याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

प्रकाशन विभागाने विविध ठिकाणी आध्यात्मिक साहित्याचे स्टॉल लावले आहेत. याव्यतिरिक्त, संत निरंकारी मिशनचा इतिहास आणि मानवतावादी कार्याचे प्रदर्शन करण्यासाठी एक चित्रमय निरंकारी प्रदर्शन आयोजित केले जात आहे आणि विशेषतः मुलांसाठी एक भव्य बाल प्रदर्शन आयोजित केले जात आहे, ज्यामध्ये मुलांच्या मनाच्या सर्वांगीण विकासात योगदान देणाऱ्या सर्जनशील आणि शैक्षणिक कार्यशाळा प्रदर्शित केल्या जातील.सर्व भक्तांना आणि थोर महात्मांना मानवतेच्या या महान मेळाव्यासाठी हार्दिक आमंत्रित केले आहे.

## संक्षिप्त

### विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत रोजगाराचा विचार करावा: प्रा. डॉ. कार्तिक गावंडे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ जिल्हा प्रतिनिधी. गणेश सपकाळ/** खरपुडी (ता.जालना) येथे अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) च्या शिबिराचे आयोजन पार्थ सैनिकी शाळा खरपुडी येथे करण्यात आले आहे शिबिरातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधींचा गांभीर्याने विचार करावा, असे मत प्रा.डॉ.कार्तिक गावंडे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रा.डॉ.शंकर तिकांडे यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करून स्वतःची ओळख निर्माण करावी असे प्रतिपादन केले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.मसुद अन्सारी, प्रा.डॉ.बद्रीनाथ शिंदे तसेच कृष्णा उगले यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना प्रा.डॉ.गावंडे म्हणाले की, ग्रामविकास साकार करण्यासाठी युवकांनी व्यावसायिकता अंगीकारणे आवश्यक आहे. बदलत्या काळात कौशल्याधारित शिक्षण, उद्योगशीलता आणि सामाजिक भान यांचा समतोल साधल्यास ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास शक्य आहे, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिबिरार्थी रोहित मोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शंकर साळवी यांनी केले. कार्यक्रमास शिबिरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री प.पू.१०८ श्री सदगुरू रामानंद स्वामी सरस्वती (तुकाबाबा)यांचा भव्य ३४ वा पुण्यतिथी सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/**श्री क्षेत्र दत्त संस्थान ताडहादगाव तालुका अंबड जिल्हा जालना येथे महान तपस्वी संत श्री प पू. १०८ सदगुरू श्री रामानंद स्वामी सरस्वती (तुकाबाबा) यांचा भव्य ३४ वा पुण्यतिथी सोहळा कार्यक्रम दि २७ जानेवारी २०२६ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मोठ्या भक्ती भावाने संपन्न होणार असून सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन,सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र, ७ ते १० ज्ञानेश्वरी पारायण ,दुपारी अडीच ते साडेपाच श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शिवगिरी महाराज यांचे संगीत महाशिवपुराण कथा,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ व रात्री दररोज ९ ते ११ हरिकीर्तन होणार आहे यात दि २७ जानेवारी मंगळवार ह भ प ज्ञानेश्वर महाराज देशमुख पंढरपूर,दि २८ जानेवारी रोजी ह भ प विष्णु महाराज केंद्रे आळंदी देवाची,दि २९ जानेवारी गुरुवार रोजी ह भ प तुकाराम महाराज खडपे परतूरकर, दि ३० जानेवारी शुक्रवार ह भ प विश्वंभर महाराज माळोदे आष्टी,दि ३१ जानेवारी शनिवार ह भ प योगीराज महाराज गोसावी पैठण,दि १ फेब्रुवारी रविवार ह भ प जगदीश महाराज जोशी त्र्यंबकेश्वर,दि २ फेब्रुवारी सोमवार एकनाथ महाराज चतर घाटकोपर यांचे हरिकीर्तन होऊन दि ३ फेब्रुवारी रोज मंगळवारी पुण्यतिथी दिनानिमित्त सकाळी सात वाजता गावातून श्रीं ची पालखी मिरवणूक होऊन त्यानंतर मठाधिपती ब्र.आत्मानंद शास्त्री महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून १० ते १२ या वेळेत काल्याचे किर्तन होऊन त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.तरी सर्व भाविक भक्तांनी श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे मठाधिपती श्री ब्र,आत्मानंद महाराज शास्त्री श्री क्षेत्र दत्त संस्थान ताडहदगाव हे कळवीत आहेत.



## 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** 'हिंद-दी-चादर' म्हणून इतिहासात अजरामर झालेले शीख धर्माचे गुरु, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी स्मृती वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ होणाऱ्या भव्य कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रम व उपक्रमांचा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सविस्तर आढावा घेतला.





जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय आढावा बैठकीत जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी एम मिन्नू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी, मुख्याधिकारी आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांनी धर्म स्वातंत्र्य, मानवी हक्क, सहिष्णुता आणि आत्मबलिदानाचे जे मूल्य समाजाला दिले, ती मूल्ये आजच्या काळात अधिकच प्रेरणादायी आहेत. त्यामुळे त्यांच्या जीवनकार्याचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही केवळ धार्मिक जबाबदारी नसून, आपले सामाजिक व प्रशासकीय कर्तव्य आहे. 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी जालना जिल्हा प्रशासनाकडून आरोग्य सेवा, वाहतूक व्यवस्था आणि स्वयंसेवक आदींची मदत करण्यासाठी प्रत्येक तालूकास्तरावर नियोजन करावे. तसेच आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती, वाहतुकीचे नियोजन आणि सामाजिक संस्थांना यामध्ये सहभागी करुन घ्यावे. जेणेकरून हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी होईल या दृष्टीने सर्व शासकीय विभाग, शैक्षणिक संस्था व सामाजिक घटकांनी एकत्रितपणे यासाठी काम करणे आवश्यक आहे. तसेच जिल्ह्यातून सहभागी होणारे भाविक, प्रतिनिधी व विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा, मार्गदर्शन व समन्वय उपलब्ध करून देण्यासाठी परिवहन विभागासह संबंधित यंत्रणांनी पूर्वतयारी करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

## जातीय द्वेषातून भोगाव येथे ४० एकर ऊस जाळला

### वंचित बहुजन आघाडीचा तहसीलवर धडक मोर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यातील मौजे भोगाव येथे एक अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. जातीय द्वेषाच्या भावनेतून बौद्ध समाजातील शेतकऱ्यांची सुमारे ४० एकर ऊस शेती अज्ञात समाजकंटकांनी पेटवून दिली. या आगीत हाता तोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या घटनेचे तीव्र पडसाद उमटत असून, पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी वंचित बहुजन आघाडीने (VBA) आक्रमक पवित्रा घेत घनसावंगी तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढला.मिळालेल्या माहितीनुसार, भोगाव येथील बौद्ध समाजातील शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस अज्ञात व्यक्तींनी जाणीवपूर्वक पेटवून दिला. ४० एकर क्षेत्रातील ऊस जळून खाक झाल्याने शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. ही घटना केवळ अपघात नसून ती जातीय मानसिकतेतून घडवण्यात आलेली असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि संघटनांनी केला आहे.

**वंचित बहुजन आघाडीचे गंभीर आरोप**

आंदोलनादरम्यान वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांनी प्रशासकीय दिरंगाईवर बोट ठेवले. त्यांचे मुख्य आरोप खालीलप्रमाणे आहेत.ऊस जळून गेल्यानंतर तो तात्काळ कारखान्यापर्यंत पोहोचवणे गरजेचे असते, मात्र साखर कारखान्याचे चेअरमन आणि संबंधित अधिकारी जाणीवपूर्वक विलंब करत आहेत.या गंभीर गुन्ह्यातील मुख्य आरोपी अद्याप मोकळे असून, पोलीस प्रशासन त्यांना अटक करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



आंदोलकांनी तहसीलदारांना निवेदन सादर करताना प्रशासनाला कडक शब्दांत इशारा दिला. जर पीडित शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळाली नाही आणि गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या गेल्या नाहीत, तर हे आंदोलन केवळ तालुक्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण राज्यभर तीव्र केले जाईल, असे नेत्यांनी स्पष्ट केले.

या धडक मोर्चात वंचित बहुजन आघाडीचे अनेक दिग्गज पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.यामध्ये दीपक डोके (मराठवाडा उपाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी), रामप्रसाद थोरात (जिल्हाध्यक्ष), परमेश्वर खरात, देविदास कोळे, चोखाजी सौंदर्य, हनुमंत मोरे, समाधान तोडके, बाबासाहेब गालफडे, बाबासाहेब सोनवणे, सतीश पट्टेकर, संतोष येडे, गौतम पटेकर, तसेच भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलाचे पदाधिकारी व मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्यांनी या न्यायाच्या लढ्यात सहभाग नोंदवला.

## वर्ष २०२४-२५ चे जिल्हा क्रीडा व युवा पुरस्कार जाहीर

जालना: जिल्ह्यातील क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडू व कार्यकर्त्यांची घोषणा जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी केली आहे. क्रीडा क्षेत्रातील योगदानाबद्दल रोहन लक्ष्मण वाघमारे (तलवारबाजी) यांना जिल्हा गुणवंत खेळाडू, तर आदित्य आसाराम घुले यांना दिव्यांग गटातून बुद्धिबळासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. एकनाथ बाळाजी सुराशे यांना सॉफ्टबॉलमधील मार्गदर्शनासाठी उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.

## लोकशाही दिनाचे २ फेब्रुवारी रोजी आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी/** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्ह्यात दि. २ फेब्रुवारी २०२६ सोमवार रोजी सकाळी ठिक १०.०० ते १२.०० वाजेपर्यंत लोकशाही दिनाचे आयोजन केले आहे. लोकशाही दिनाकरीता अर्जदार यांनी अर्ज विहीत नमुन्यात १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. या लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना त्यांनी संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही अशाच अर्जदाराने टोकन क्रमांकाच्या पावतीसह विहीत नमुन्यात दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा तसेच ज्या अर्जदाराने तालुकास्तरीय लोकशाही दिनात भाग घेतला नाही अशा अर्जदाराचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असे जिल्हाधिकारी कार्यालय जालना यांचे कार्यालयाकडुन सुचीत करण्यात येत आहे. कोणत्याही स्तरावर लोकशाही दिनात खालील बाबींशी संबंधित अर्ज स्वीकारले जाणर नाहीत.

न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व,अपील, सेवाविषयक आस्थापनाविषयक बाबी, विहीत नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाशी तसलिदार यांच्या स्वाक्षरीची पोच पावती तसेच त्यासाठी दिलेल्या मुदती व नमुन्यात ज्यांनी यापुर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले.

असतील त्यांना तक्रार मांडता येईल ज्यांनी त्यापुर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे. परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नये. तसेच लोकशाही दिन विहीत नमुन्याचा अर्ज http:jalna.nic.in या संकेस्थळावर उपलब्ध आहे.

## भोकरदन पोलिसांची थरारक कामगिरी! चित्रपटाच्या स्टाईलने पाठलाग करून आंतरराज्य 'डुक्कर चोर' टोळी जेरबंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन (प्रतिनिधी)** भोकरदन शहरात चोरीच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका सराईत आंतरराज्य टोळीचा भोकरदन पोलिसांनी भल्या पहाटे थरारक पाठलाग करून पर्दाफाश केला आहे. एखाद्या चित्रपटाला शोभावा अशा पद्धतीने पोलिसांनी फिल्मी स्टाईलने पाठलाग करून टोळीच्या मुसक्या आवळल्या. या कारवाईत दोन तलवारी, एक पिकअप वाहन आणि चोरीचे साहित्य जप्त करण्यात आले असून, चोरांशी झालेल्या झटापटीत एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे.

**दोन तलवारी, पिकअप आणि चोरीचे साहित्य जप्त; झटापटीत एक पोलीस कर्मचारी जखमी**

बुधवारी पहाटेच्या सुमारास संपूर्ण शहर साखरझोपेत असताना पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक शहरात गस्त घालत होते. यावेळी एक संशयास्पद पिकअप वाहन शहरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती पीआय बिडवे यांना मिळाली. पोलिसांनी तात्काळ हालचाली करत संशयास्पद वाहनाचा शोध सुरू केला. पोलिसांची गाडी पाहताच चोरट्यांनी आपले वाहन वेगाने पळवण्यास सुरुवात केली.

फिल्मी स्टाईल पाठलाग आणि झटापट

पोलिसांनी हार न मानता या टोळीचा पाठलाग सुरू केला. चोरांनी पोलिसांना चकवा देण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांना घेराव घातला. स्वतः ला अडकलेले पाहून चोरट्यांनी पोलिसांशी हुज्जत घालत झटापट सुरू केली. या झटापटीत पोलीस अंमलदार लक्ष्मण रानगोते हे जखमी झाले. मात्र, जीवाची पर्वा न करता पोलिसांनी यातील एका सराईत गुन्हेगाराला जागीच झडप घालून पकडले, तर त्याचे इतर साथीदार





अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

**शस्त्रास्त्रे आणि मुद्देमाल जप्त**

पकडलेल्या चोराच्या वाहनाची झडती घेतली असता पोलिसांना धक्कादायक वस्तू आढळल्या. वाहनात दोन धारदार तलवारी, डुक्कर चोरी करण्यासाठी लागणारे विशेष साहित्य आणि एक पिकअप वाहन जप्त करण्यात आले आहे.

ही टोळी आंतरराज्य असून गेल्या अनेक दिवसांपासून विविध भागात धुमाकूळ घालत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या पथकाने बजावली कामगिरी

ही धडाकेबाज कारवाई पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक पवन राजपूत,सागर शिंदे,पोलीस अंमलदार प्रशांत उबाळे, विकास जाधव, अनिल गवळी, किरण मोरे, लक्ष्मण रानगोते आणि पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने पार पाडली.

पोलिसांचा इशारा: गुन्हेगारांनी कितीही सावधगिरी बाळगली तरी पोलीस त्यांच्या दोन पावले पुढेच आहेत. शहरात शांतता भंग करणाऱ्या कोणत्याही टोळीची गय केली जाणार नाही.

## 'शाहिरी' ही केवळ कला नसून समाजजागृतीचे प्रभावी माध्यम!- प्रा. शैलजा कुलकर्णी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**महाराष्ट्राच्या इतिहासात, शौर्यगाथांमध्ये आणि समाजप्रबोधनात शाहिरांचे योगदान अनमोल आहे. शाहिरी ही केवळ मनोरंजनाची कला नसून ते समाजजागृतीचे एक प्रभावी आणि सशक्त माध्यम आहे, असे प्रतिपादन लोककला अभ्यासक व छत्रपती संभाजीनगर येथील देवगिरी महाविद्यालयाच्या संगीत विभागप्रमुख प्रा. शैलजा कुलकर्णी यांनी केले.येथील जे.ई.एस. महाविद्यालयाच्या केंद्रीय सभागृहात महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्य संचालनालय (मुंबई) आणि महाविद्यालयाचा लोककला विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहा दिवसीय शाहिरी प्रशिक्षण शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते.व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ शाहीर अप्पासाहेब उगले, मराठी विभागप्रमुख डॉ. यशवंत सोनुने, शाहीर रामानंद उगले आणि शिबिर संयोजक व लोककला विभागप्रमुख शाहीर कल्याण उगले यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थितांना मार्गदर्शन करताना प्रा. कुलकर्णी पुढे म्हणाल्या की, शाहीरी परंपरा टिकवण्यासाठी सांस्कृतिक कार्य संचालनालयाने राबवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आहे. महाराष्ट्राची संस्कृती व लोकपरंपरा या लोककलेतूनच जिवंत राहतात. त्यामुळे या कलेचे जतन होणे काळाची गरज असून, प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याला लोककलेतील किमान एक कलाप्रकार तरी शिकवावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

**जाहीर प्रगटन**

तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सूचित करण्यात येते की, खालील तपशिलात वर्णन केलेली मिळकत माझे पक्षकार १) **श्री. नितीन सुभाषराव सातपुते** आणि २) **श्री. सचिन सुभाषराव सातपुते** (दोघे रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना) यांनी **श्री. विशाल मधुकर कांबळे** (रा. अंबड, ता. अंबड, जि. जालना) यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले असून, त्याबाबतचा 'ईसारपावती' व्यवहार दिनांक २२/०१/२०२६ रोजी पूर्ण झाला आहे.

**मिळकतीचा तपशील:** नगर परिषद हद्दीतील मौजे कसबे अंबड, ता. अंबड, जि. जालना येथील सर्वे नंबर ४०/१ मधील पडलेल्या प्लॉटपैकी प्लॉट नं. ८८.

**नगर परिषद मिळकत क्रमांक:** १८-१३०-८८/५

**सिटी सर्वे नंबर:** १८६७/अ/८६ आणि १८६७/अ/८७ (PR कार्डवरील क्षेत्रानुसार)

**एकूण क्षेत्रफळ:** १०६.२५ चौ.मी. (अर्थात ११४३.२५ चौ. फूट)

**मिळकतीच्या चतु:सीमा:**

**पूर्वेस:** न.प. मिळकत नं. १८-१३०-८८/०६

**पश्चिमेस:** न.प. मिळकत नं. १८-१३०-८८/०४

**दक्षिणेस:** प्लॉट नं. ९२, ९३, ९४, ९५ व ९६

**उत्तरेस:** १२ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता

उपरोक्त मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बिनबोजाची आहे असे सांगून हा व्यवहार निश्चित झाला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाही व्यक्तीचा, बँकेचा, संस्थेचा किंवा इतर कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, वारसा हक्क, पोटगी, जप्ती, करार किंवा इतर कोणताही कायदेशीर हक्क अगर हितसंबंध असल्यास, त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मूळ कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी.

मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास, सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून माझे पक्षकार खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्या माझ्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दिनांक: २२/०१/२०२६
ठिकाण: अंबड/जालना
आपला/कळावे,

लिहून देणार (स्वाक्षरीत)
**विशाल मधुकर कांबळे**
लिहून घेणार (स्वाक्षरीत)
**नितीन सुभाषराव सातपुते**
**सचिन सुभाषराव सातपुते**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813